**MHKO100013282016**

## आदेश निशाणी क्र. ४७

**१.** वादीतर्फे वारस यांनी सदरचा अर्ज वादी बाबुराव लक्ष्मण उपराटे हे दिनांक १४/१०/२०२३ रोजी मयत झाले आहेत व त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे. वादीतर्फे वारस यांचे पुढे असे कथन आहे की, वादी यांना अर्जात नमुद सरळ व कायदेशिर वारस असून अन्य कोणीही वारस नाहीत.

**२.** प्रतिवादी यांनी सदर अर्जास आपले म्हणणे निशाणी क्र. ४८ वर दाखल अर्जातील मजकुर नाकारला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जात वारसांची नाव व पत्ते अपुरे नमुद केले असलेने अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे.

**३.** अर्ज व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

**४.** वादी बाबुराव लक्ष्मण उपराटे हे दिनांक १४/१०/२०२३ रोजी मयत झाले आहेत. वादी यांनी सदरचा अर्ज दिनांक २३/११/२०२३ रोजी दाखल केला आहे. यावरुन असे दिसून येते की, वादी यांनी सदरचा अर्ज मुदतीत दाखल केला आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

### आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. वादीतर्फे वारस यांनी दाव्यात १४ दिवसांचे आत दुरुस्ती करावी व दाव्याची दुरुस्ती प्रत दाखल करुन पुढील पुर्तता सत्वर करावी.
३. अर्जाचा खर्च मुळ अर्जात समाविष्ठ करणेत येत आहे.

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक २३/११/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज